# मराठी गझल

गंगाधर महांबरे

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २७५०



REFBK-0023535
REFBK-0023535

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
2790
23434
काव्य 24/5/52

संदर्भ काव्य
२४५०
23534
25|4|82

# मराठी गझल

गंगाधर महाम्बरे

REFBK-0023535
REFBK-0023535

उत्कर्ष प्रकाशन, पुणे ४.

प्रकाशक :
सौ. सविता सु. जोशी
उत्कर्ष प्रकाशन
रेणुका अपार्टमेंट्स
भांडारकर रस्ता
पुणे ४११ ००४.

© : अरुंधती महाम्बरे

मुखपृष्ठ आणि सजावट :
सुभाष अवचट

प्रथमावृत्ती : कार्तिक शु. १
बलिप्रतिपदा शके १९०३. १९८१

प्रकाशन क्रमांक : ५३

मूल्य : बारा रुपये

मुद्रक :
प्रमोद वि. बापट
प्रमोद प्रिंटर्स
१०१९, सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०.



कविश्री राजा बढे

**गीतांजली**

माझ्या घेऊनिया सुगंधि गझला येता इथे मैफली
राजाभाऊ, ये यादगार तुमची; प्रेमळ स्मृति जाहली
गाने मख्मली, रामटेकि पाने, नादात टाळी दिली
आठवुनि तव दाद; पेश करितो तुम्हास गीतांजली...

—गंगाधर महाम्बरे

# मराठी गझल : एक अभ्यास

मराठी गीत प्रकाराने कळत न कळत उर्दू भाषेतील गझल प्रकार सामावून घेतला. गझल या शब्दाचे कोकणीतील ‘ गजाल ’ या शब्दाशी असलेले नामसादृश्य लक्षणीय वाटते. आणि गझलची गजालीशी तुलना करण्याचा मोह होतो. दोन्ही प्रकारातील नाटयात्मकता आणि काहीतरी जाणवलेले तीव्रतेने सांगण्याची शब्दकळा (पुन्हा पालुपदावर येण्याची रीत-भातही ! ) समानधर्मी असतात. म्हणूनच की काय पु. ल. देशपांडे ‘ गझल ’ हे केवळ वृत्त नसून ती एक वृत्ती आहे असे मानतात आणि तिच्यातील सूक्ष्म आणि सुंदर निवृत्तीवर बोट ठेवून ‘ स्वार्थाच्या बाजारात धडपडण्याला आपण चुकीने प्रवृत्ती मानत आलो आहोत. क्षणभर निवृत्त मनाने जगाकडे पहाता आल्याशिवाय खऱ्या प्रवृत्तीची गोडीच कळत नाही ’ असे म्हणतात. गझल या प्रकाराची माहिती होण्यापूर्वी किंवा जाणीवपूर्वक मराठी गझल लिहिणाऱ्या गीतकारांच्या खूप आधी मोरोपन्तानी गझल प्रकारातील ‘ रसने न राघवाच्या थोडी यशात गोडी ’ हे संपूर्ण गझल बनावटीचे गीत लिहिलेले आढळते. मोरोपन्तांच्या काव्यात वृत्तालंकारांची विविधता आपल्या दृष्टीस पडते. अर्थाच्या अभिव्यक्तीसाठी संस्कृतप्रमाणे मराठी भाषाही नागर असू शकते हा समज मोरोपंतांनी दृढ केला. मराठी रंगभूमीच्या माध्य-मानेही आपल्याला गझलांचा पूर्व परिचय झालेला आहे. मराठीतील शत-संवत्सरी नाटक ‘ शाकुन्तल ’ उदाहरणार्थ पहा. त्यातील ‘ मोहीले मन्मानसा या ’ ‘ केलीस अशी काय परीक्षा ’ ही नाटयगीते गझल प्रकारातील आहेत. कोल्हटकरांच्या गुप्तमंजूष मधील ’ अहो पाषाणराजींनो ’ आणि ‘ मूकनायक ’मधील सुखाषा काही माते, अष्टमीचा चन्द्र याही गझला आहेत, ‘ कादम्बरी ’ या आता प्रयोगरूपाने रंगभूमीवर सादर न होणाऱ्या नाटकातील ‘ शशांक मूर्तें आणि ‘ कळेना की कशासाठी ’ ही गीतेही गझलाच आहेत. काकासाहेब खाडीलकरांच्या ‘ द्रौपदी ’तील ‘ पांडवा सम्राट पदाला ’ या गझलाच्या नावावरूनच माधवराव ज्यूलियन यांनी त्या वृत्ताला ‘पांडव ’ असे नाव दिले आहे. ‘ लाखाची गोष्ट ’ मधील ‘ लाज वाटे आज भारी’ हा गझल याच वृत्तातला आहे. चालीच्या सोपेपणामुळे मराठी गीत-

कारांना गझलांचा मराठीमध्ये वापर करणे सोयीचे वाटले ही वस्तुस्थिती आहे. काव्य हे गाण्याच्या दृष्टीने परिणामकारक असते याची संपूर्ण जाणीव असल्यामुळे रविकिरण मंडळाच्या कवींनी अनेक नवीन जाति- छंदाच्या शोधात असताना त्यातील नवे नवे प्रकार शोधून काढले. आणि अशा रीतीने त्यांच्या हाती गझलांची एक फार मोठी ठेव आली, माधवराव ज्यूलियनांनी रविकिरणमंडळाचे एकोणिसावे पुस्तक म्हणून मराठी रसिकाला 'गज्जलांजली' अर्पण केली. गझलांचा अभ्यास करू इच्छिणाऱ्यांनी या पुस्तकाची पारायणे केली पाहिजेत असे मला वाटते. या पुस्तकाचा थोडक्यात सारांश असा सांगता येईल की गझल हा अक्षरशः तालबद्ध असल्यामुळे त्यात स्वरविस्ताराला वाव चीजेइतका मिळू शकत नाही. नाटककारांनी केलेल्या गझलांच्या रचना- मूळच्या उर्दू पदांच्या सदोषतेमुळे म्हणा किंवा लघुगुरूक्रमाचा बोध नीट न झाल्यामुळे म्हणा- फारच शिथिल झाल्या. चालींचा स्वीकार करताना वृत्त शैथिल्य मान्य होऊ नये. धात्वर्थाने पहाता गझल म्हणजे प्रेमालाप होय. अर्थात शृंगार हाच गझलाचा मुख्य विषय आहे. प्रेमगीतात स्वाभाविकपणेच विप्रलम्भशृंगाराचा आविष्कार अधिक आढळतो. काही गझल सृष्टिवर्णनपर, बोधपर व ध्येयस्तुतिपरही असतात. अरबी- फार्शी वृत्ते शुद्ध स्वरूपात मराठीत आणावीत या हेतूने ही भावगीते बहुतेक लिहिण्यात आली आहेत.' माधवरावांनी जाता जाता काही प्रयोगही केले आहेत. उदाहरणार्थ 'तुजवीण सखे मज कोणी नसे' या 'वासन्तउषा' शीर्षकाखाली प्रसिद्ध झालेल्या गझलमध्ये केलेली दोन वृत्तांची योजना परिणामकारक वाटते. तोटक, भुजंगप्रयात, गीतिका, पंचचामर इत्यादी मराठीतील जुन्या वृत्तांमध्ये केलेल्या रचना गझल प्रकारामध्ये येऊ शकतात. मात्र अक्षर गुणवृत्तांकित असलेल्या गझलच्या चरणातील अक्षर संख्याच निश्चित असते असे नाही तर चरणातील त्या त्या स्थानाची अक्षरे लग-क्रमाने निश्चित असल्यामुळे मराठीतील कित्येक गझला या माधवरावांनी सुचवलेल्या शास्त्रशुद्ध नियमांशी निगडीत आहेत असे म्हणता येणार नाही. 'अभिनव काव्य प्रकाश' या आपल्या ग्रंथामध्ये प्रा. रा श्री. जोगांनी काव्य-दोषाचा विचार करताना कुसुमाग्रजांच्या 'गर्जा जयजयकार' बोरकरांच्या 'तव श्वासे जग अवघे' ची उदाहरणे दिली आहेत ती जिज्ञासूंनी पहावीत.

गझल प्रकाराचे मराठी कवींनी स्वागत केलेले असले तरी आजही आपल्या कवींना त्याचे संपूर्ण अंतरंग गवसलेले नाही असे गझलांचा अभ्यास करताना ध्यानात येते. माझ्या या संग्रहातील गझला तिऱ्हाईत अभ्यासूच्या दृष्टींनी पहाताना ही गोष्ट ध्यानात आली आहे हे मी नम्रपणे नमूद करू इच्छितो. एक अभ्यासू या दृष्टीने माझ्या नजरेला एक गोष्ट आली ती अशी की या संग्रहातील माझ्या गझला मी लिहिल्या त्या प्रायोगिक स्वरूपातील आहेत. माझी गझल निर्मिती ही एक प्रयोग शाळेतील प्रयोगांची मालिका होती. त्या त्या प्रयोगांची मला मिळालेली सोल्युशन्स म्हणजे या मराठी गझला होत. माधवरावांनी लिहिलेल्या ' गज्जलांजली ' नंतर उर्दू वाङ्मयाने अंगीकारलेले काही नवे गझल प्रकार गेल्या पंधरा वीस वर्षांपासून हिंदीमध्ये आले आहेत. ते मी इथे नव्याने दिले आहेत. उदाहरणार्थ या संग्रहातील संधी काली या अशा, हसेहसेरे जग सारे, आभाळलेल्या जळात इ. गझल ! अशा नव्या वृत्तांमुळे संगीतानुकूलता लाभलेला (गझल) प्रकार अधिकच समृद्ध होईल अशी मला आशा वाटते. मात्र संगीत हा गझलांचा प्राण नाही हेही इथे ध्यानात घेतले पाहिजे मेहद्दीहसन, गुलामअली गझलांमध्ये जी सरगम छेडतात त्यामुळे गजलांना संगीतातील चिजांचे स्वरूप प्राप्त होते हे विसरून चालणार नाही.

गझलांचे स्पष्ट स्वरूप अद्यापही आम्हा मराठी कवींना स्पष्ट झालेले नाही. प्रा. भवानी शंकर पंडीत आणि ना. ग. जोशी यांचा या संदर्भातील एक पत्र व्यवहार आठवला. ' तुलनात्मक छंदोरचना ' या ना. ग. जोशींच्या ग्रंथाच्या एका परीक्षणामध्ये प्रा. पंडितांनी मोरोपन्ती गीतासंबंधीच्या चर्चेमध्ये ' सख्या राम हरे कृष्ण बोल बरे ' या धृपदाचे पद हे गुरुलघुगुरूगुरू या मात्रागटामुळे गझलांच्या धाटणीचे आहे असे म्हटले होते. त्यावर ते तसे नसल्याची प्रतिक्रिया प्रा. जोशींनी व्यक्त केली होती. मराठीमध्ये दहा बारा वृत्तांपेक्षा अधिक वृत्तांमध्ये लिहिलेल्या गझला आज प्रचलित नाहीत. अत्यन्त प्रचलित असलेल्या एका वृत्ताचे उदाहरण घेऊन थोडेसे स्पष्टीकरण करतो. माधव ज्यूलिअननी ' प्रेमस्वरूप आई ' हा जो गझल लिहिला आहे तो लताच्या आवाजात ध्वनिमुद्रितही झालेला असल्यामुळे वाचकांना तुलनात्मक अभ्यासाच्या वेळी गुणगुणण्याची सोय झाली आहे. या गझल

प्रकारामध्ये अक्षरांची संख्या ७+७=१४ अशी आहे. आता या वृत्तातील विविध कवींनी केलेल्या गझला आणि त्यातील अक्षरगणांमुळे गझलच्या मूळ प्रकृतीला न जुळणाऱ्या पुढील गझलाच्या ओळी पहा– गीतरामायण-मधील सुग्रीवाच्या ‘साक्षीस व्योम पृथ्वी’ मधील वनवास भोगताहे, तुज काय सांगू आर्या, पाडगावकरांच्या ‘लाजून हासणे ‘मधील ’तिरपा कटाक्ष भोळा, ‘लग्नाची बेडी’ मधील ‘ती पाहताच बाला’ मधील ‘कलिजा खलास झाला’, राजा बढेंच्या ‘हो त्या किती उमेदी’ मधील ‘रचिले मनी मनोरे’ सुरेश भटांच्या समजावता न आले’ मधील तीच ओळ (आणि मी लिहिलेल्या ‘पाण्यातले पहाता मधील ‘प्रतिबिंब हासणारे’ ही ओळ. जाता जाता सहज आठवलेली ही उदाहरणे आहेत. मराठी कवीनी गझला लिहिल्या, यापुढेही लिहिल्या जातील चालीच्या जोरावर लघुगुरू होईल गुरू लघु होईल परंतु माधवरावांनी लिहिल्याप्रमाणे शास्त्रशुद्ध गझला जेव्हा मोठ्या प्रमाणावर लिहिल्या जातील तेव्हा मराठीतील हा गीतप्रकारही खऱ्या अर्थाने समृद्ध होईल.

मराठी गझल : एक अभ्यास हे या टिपणीचे दिलेले नाव अशासाठी की माझ्या प्रयोगशाळेतील प्रात्यक्षिकांचे हे तक्ते मी जसे पुढे आले तसे माझ्या प्रिय वाचकांसमोर ठेवले आहेत. सुदैवाने या संग्रहातील अनेक गझला लता मंगेशकर, आशा भोसले, सुमन कल्याणपूर, परवीन सुलताना, आरती मुखर्जी, रामदास कामत, अरुण दाते, दशरथ पुजारी, आर. एन. पराडकर, वसंत आजगावकर सारख्या अनेक नामवन्त गायक–गायिकांनी गायल्या आहेत. संगीतकार हृदयनाथ मंगेशकर, श्रीनिवास खळे, अशोक पत्की, राम कदम, राम फाटक सारख्या संगीतकारांनी त्याला चाली दिल्या आहेत आणि अली सरदार अली जाफ्रीसारख्या रसिक उर्दू शायराने मला प्रत्यक्ष भेटीत आणि पत्रद्वारेही आपली दाद दिली आहे. या सर्व सुखद जाणीवे, बरोबरच माझ्या गझल रचनेतील उणीवांचेही स्मरण करून या अभ्यासाची सांगता करतो.

‘शिवरंजनी’
१२ कलानगर
पुणे–सातारा रस्ता
पुणे ४११००९.

–गंगाधर महाम्बरे

गंगाधर महाम्बरे

# मराठी गझल

## : अनुक्रम :

रसिका
गाणी अधरातली
अनामिकेस
धुंदलेल्या या घडीला
प्रीत मिळे
कठपुतली
प्रीतिची रेशमी दोरी
मी मनी हसते
पर्वणी
सदा तू सांगशी
आलापुनि माझ्या मनी
जग हे विचित्र भारी
चांदराती
पिलु
दिले ज्याने
दे मला साकी
उर्मिला
नभाच्या अंगणी
ठेवून आपुल्या उशागती
मानिनी
चंद्रबिंब वरि कलते
मध्यरात्री
पाण्यातले पहाता
प्रीतिकथेस अपुल्या
नवा गझल
वाटे भल्या पहाटे
जीवनाची वाट
आज माझ्या गज्जलाविण
साऊलीस का कळे
तुझ्या पंखावरुनि
का आसवात भिजता
गालिब
आहे पुढचात घडली
खुपलेस किती खंजीर
भिकारी
दुनियेस शोधू दे ना
चक्रव्यूह
आर्त तुझ्या गीतातुनी
का ?
धुंद धुंद ही हवा
नसेल माहित
मी एकली
डोळा पाणी दाटे
बोलून प्रेमबोल
जिथे मी गीत गाते
पानोपानी मंद सुशीतल
संयोगिता
मनमोकळी

फुलायचे म्हणुनी
भेट ती
मनवारू
वालुका नसे
पुसलेस आज आसू
सांज झाली
आभाळलेल्या जळात
झोकले आयुष्य माझे
सुरईत जसे
तूच एकली
कधी कधी
भेटली नसतीस जर
प्रेमगीते गोड गा
सुख छळते
भीती
साम्य नि फरक
संधीकाली या अशा
वाट
दिवसा कळते
अस्फुट अधरावरती
चुकवून आज आले
रंगली मेंदी कशी
एकवार भिजु दे
शाल्मली छायेत
बेचैन जिवा रमवाया
जीवनाच्या रंगरेखा
मित्र म्हणावे
व्हायचे ते होऊद्या
सदा बहार
शोधिते मी
राजसा झालास माझा
सूर्यप्रिया
प्रीतिचे वर्ष
काही ना मजपाशि
दोन लोचनांनी
ठेविशी आरोप का ?
आसवांचे गीत
तुला ध्यानि मनी
प्रश्नोत्तरे
पहिल्याच तव नजरेतली
नको वायदा
सखि मदिरे
समिधा
कुणी उठावे
प्रीतबाला
चांदण्यात चंद्रकले
जाऊ कशाला दूर ?
नाही जगात कोणी

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
2850
वा. क्र. 23434
काव्य 25141
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

## रसिका

रसिका तुझ्याचसाठी मी एक गीत गाते
हृदयात दाटलेली भावांजली वहाते...

आले दुरून येथे घेऊन सूर कंठी
जणु विठ्ठला घरी ये दिंडीच वाळवंटी
रसिकात देव माझा दिनरात मी पहाते...

माझी फुले सुरांची मधुबोल गंध देती
आलाप छंद घेता निमिषात धुंद होती
बांधोनि भावपूजा मी भाग्यवन्त होते...

जनमानसात देवा दिसशी समोर जेव्हा
हृदयात दाटुनि ये आनन्दपूर तेव्हा
शतजन्म हेच राहो अपुले अभंग नाते...

## नवा गझल

आज नवा गाणार गझल
मी रंगवुनी मैफल
आज नवा गाणार गझल...

जुगार खेळुन कुणि दैवाशी झोकुन जीवन देती
जगता जगता मरती आणिक मरता मरता जगती
या गझलेतुन मने तयांची दाविन करुनी उकल...

सौंदर्याच्या पार्श्वभूमीवर रम्य सुखाच्या राई
दर्दभरी दिसतील हिरवळी अन् दु:खाच्या खाई
मनोरथांच्या नवलरथातुनी हृदयंगम ही सहल...

गुलाम अवघे जे नियतीचे मानव जन्मा आले
चित्रण त्यांच्या आकांक्षांचे चित्रांकित केलेले
सौम्य आणखी गर्द रंग हे करितिल चित्र सफल...

## गाणी अधरातली

गाणी अधरातली दिवाणी
प्रीती वदतात दीनवाणी...

आक्रंदन ऐकवी जगा ती
त्या त्याच पुन्हा स्वरास्वरांनी...

वाटे कथिते असे कशाला
ती तीच उगा जगा कहाणी...

शोधीत कधी समानधर्मा
गाई रसिका अशी विराणी...

कोमल हृदयी कळ्याफुलांची
ही प्राशित आसवे इमानी...

## वाटे भल्या पहाटे

वाटे भल्या पहाटे यावे तुझ्या महाली
हलकेच जागवावे गाऊनिया भूपाळी...

झोपेत जाग थोडी असशील गुंगलेली
सुखपूर्ण गोड निद्रा फुलवील स्वप्नवेली
खुडताच स्वप्नसुमने होऊनी तू अबोली...

अरुणासवेच अंगी कर आपुला फिरावा
समिरासवेच सहजी तव कुंतली रमावा
माधुर्य ओठी लपले द्यावे तुझ्या हवाली...

अनिरूद्ध अन्तरीचा मी मंचकासमोर
जणु आणिला सखीने बांधोनि प्रेमदोर
हे मोरपंख तुझिया फिरवोनि दोन्ही गाली...

## अनामिकेस

आहेस जेथे तू तिथे ग थाम्ब थोडी अनामिके
सौंदर्यशालिनी प्रेमले तुज पाहु दे मज कौतुके...

आयुष्य माझे प्रीतिच्या तारुण्य क्षितिजावरी झुके
तुज पाहिले अन् माझिया हृदयातला ठेका चुके...

डोळे भरूनि तुला मला बघु दे असे ग मदालसे
पाहू दुरून परस्परा अन् शब्द बोलूया मुके...

स्वर्गीय सौंदर्यात या स्वर्गातली सारी सुखे
दोघास भेटिच्या क्षणी वेढून जाऊ दे धुके...

## जीवनाची वाट

जीवनाची वाट वेडी ती कधी ना संपते
थांबतो थोडा प्रवासी; वाट कुठली थांबते ?...

माणसाचे हृदय हळवे; भाबड्या त्या भावना
गुंगणारे मन निरागस; रंगती नवकल्पना
मरण घेऊन रूप गोंडस जगुन पुन्हा पाहते...

आसवांसाठीच डोळे, पापण्यांचे रांजण
हुंदक्यांचा हक्क येथे हासण्यावरी बंधन
एकटे बिनचेहऱ्याचे दैव केवळ हासते...

भोवताली दिसती जे जे ते सुखाचे सोबती
जीवनी कोणी न साथी, कोण धावे संकटी ?
जीवनाच्या अंतरंगी एकलेपण रंगते...

## धुंदलेल्या या घडीला

धुंदलेल्या या घडीला लोचनामधि पूर का ?
भाबड्या स्वप्निल मनाचा अन् जळे कापूर का ?...

सोबती आहे सखा अन् प्रीत आहे सोबती
संग सोडुनि सोबतीचा या मनी काहूर का...

स्वच्छ निर्मळ जळ जरी का गढुळ मज ते भासते
या प्रकाशी चांदण्याच्या घनतमाचा धूर का ?...

नखशिखान्ती मी सख्याच्या बाहुपाशी विसावते
भान ठेवुन दो धृवासम कैक अन्तर दूर का ?...

## आज माझ्या गज्जलाविण

आज माझ्या गज्जलाविण रात्र ही सरणार नाही
मैफलीमध्ये उद्याच्या मी इथे असणार नाही...

हक्क मी सांगेन येथे बैठकीवर आपुल्या
गायिल्यावाचुन गज्जल आज मी उठणार नाही...

ऐकुनि माझाच गज्जल लागला तुम्ही गुणगुणू
प्रतिध्वनी माझा की तुमचा ते कुणा कळणार नाही...

ज्ञात ते मज सर्व असती तत्वज्ञानाचे धडे
वास्तवाच्या संगती मज तर्क तो पटणार नाही...

मांडिले सर्वांसमक्ष मीच माझे आसन
आसनापासून माझ्या आज मी ढळणार नाही...

## प्रीत मिळे

हसे हसे रे जग सारे परि मज प्रीत मिळे
थरारल्या ओठांना धुन्द एक गीत मिळे...

अबोध रचिला लपंडाव प्रीतिचा जरी तू
मनातल्या मनात मी खूष हारजीत मिळे...

जगास वाटे दुजी मीरा प्रेमवेडी मी
मनास मात्र स्वर्गसौख्य कल्पनातीत मिळे...

म्हणाल 'जळते का मी विरहाग्नीमधुनी !'
हेमकान्ती सुवर्णास तप्त अशि अग्नीत मिळे...

# साऊलीस का कळे

साऊलीस का कळे उन्हामधील यातना ?
जाणवेल मीलनी कोण विरहवेदना ?

असती माहिती कशी नदीस घोर वादळे ?
आसवात जग बुडे, मृगजळास का कळे ?
जी व्यथा नभातली ती कथाच अंगणा...

फूलपंखी का कधी गरुडझेप घेतसे ?
काजळी तमास का रंग कोणी देतसे ?
हृदयशून्य करिल कोण मंदिरात प्रार्थना ?...

रजनीच्या घरी कधी होई सूर्य पाहुणा
दिसती ना कधी कुणा अन्तरातल्या खुणा
सांगते अबोली का कुणास मुग्ध भावना ?...

## कठपुतली

रंगमंचकी तुझ्या नाचते मी कठपुतली गोरी
तुझिया हाती असे माझिया आयुष्याची दोरी...

नसती श्वास, हा देहच परका
गळयात माझ्या नसे हुंदका
असुनि पाऊले चालण्यासही झाली मजसी चोरी...

दिसेल जे जे समोर आले
उघडे ठेवुनि अपुले डोळे
निर्विकार चेहरा पाहतो दसरा दिवाळी होरी...

तुजसाठी रे प्रपंच सारा
मानुनि केवळ तुझा इशारा
मिटुनी जाते फुलापरी तव करपाशी अंधारी...

## तुझ्या पंखावरूनि

तुझ्या पंखावरूनि या मला तू दूर नेशिल का ?
तुझ्या या धुंद सुमनाचा मला तू गंध देशिल का ?

धुंद हवा, गंध नवा, हवेत हा गारवा
साथ तुझी त्यात अशी मला मिळे राजिवा
प्रीतीच्या स्वप्नी सदा, असाच येशिल का ?
तुझ्या पंखावरूनि या मला तू दूर नेशिल का ?...

आज नवे गीत हवे सांगे मनोभावना
आज दिसे विश्व कसे नवे नवे लोचना
नित्य असा सांग सदा माझाच होशिल का ?
तुझ्या पंखावरूनि या मला तू दूर नेशिल का ?...

## प्रीतीची रेशमी दोरी

प्रीतीची रेशमी दोरी बांधिली मी गोरी
नाही केली चोरी, का जाशी चंचल होऊनि तू माघारी ?

पसरीन पदतली रम्य पुनव चांदणे
सौदामिनीची तुज बांधिन मी पैंजणे
उधळीन तुझ्यावरी गंधित फुले टपोरी...

तुजसाठी फुलविन नेत्री स्वप्ने नवी
ओठावरी गज्जल दर्दभरी लाघवी
तू नकोस जाऊ सोडुनि चित्रचकोरी...

तुजसाटी रचिला ताजमहाल मी मनी
सर्वस्व तुझे मी कुंकवाचा धनी
का वनवासाला जाशी अशी किशोरी...

## का आसवात भिजता ?

का आसवात भिजता माझ्याच लोचनांनो
येणार नाही आता ऐकुनि तो पियानो...

नव्हता वसन्त तरिही बहरात प्रणयवेली
मनि नाही वांछिली ती स्वप्ने फुलून आली
फुलता कशास आता वेलीवरी फुलांनो ?...

कंठी सुखी सुरांचे जे रंगरूप होते
विरहात गळुनि गेले केव्हाच विरूनिया ते
आशा उरी कशाला या व्यर्थ भावनांनो ?...

तिमिरात रात तेव्हा प्रहरात फुलुनि गेली
रजनी कशीही आली ती चांदरात झाली
देता प्रकाश आता का तिमिरि चांदण्यांनो ?...

## मी मनि हसते

सजणा, तू सदा म्हणशी की मी मनि हसते
कळली नाही आदत कैसी पण मी मनि हसते...

समजून सर्व न कळे मी अजुनि अजाण
समजे नाही हालत कैसी पण मी मनि हसते...

कळले जर असते तुज का नसते कथिले ?
कळते आहे वाहत ऐसी पण मी मनि हसते...

बघु दिलवर, दोघे सुंदर प्रणयी दुनिया
तुजला नाही सांगत कैसी पण मी मनि हसते...

## गालिब

तुज अर्थ जीवनाचा गालिब रे कळाला
अन् आत्मनिष्ठ तुझिया गझलात व्यक्त झाला...

तुझिया ललाटलेखी 'हा जन्म जीवदान
आजन्म डाव खेळू राहून सावधान–
सुटका नकोस शोधू दे मोह या जिवाला...'

तुज विश्व भासले हे प्रतिबिंब जाणिवेचे
जणु आरसा स्व-रूपी प्रतिमा अखंड वेचे
मनदर्पणी सुखाच्या तू दाविला जिव्हाळा...

तव लक्ष चुंबनानी भिजले सहस्र बाण
दिनरात झुंजताना दिधले मृतास प्राण
आरंभ तू सुखाचा दुःखात शोधिलेला...

स्वीकारले सदा तू आव्हान या जगाचे
माथी कलंक, पोटी खग कोकले भुकेचे
परि पारख्या न झाल्या गझला स्वतंत्रतेला...

## पर्वणी

तुझ्यावाचुनी नाही, सखी, कोणि या क्षणी,
न ये सारखी केव्हा अशी रम्य पर्वणी.

वियोगात झालेली जरी प्रेमकूजिते
विहंगापरी गाऊ, गडे, गान अंगणी.

सुरेली सुखे झाल्या रसोदात्त गीतिका
खऱ्या स्वर्गसौख्याच्या मना रागरागिणी.

पहा प्रीत दोघांची तुझी तूच साजणी
सुरांच्या बहारीने दिसे खूप देखणी.

तुझ्यावाचुनी नाही, सखी, कोणि या क्षणी,
न ये सारखी केव्हा अशी रम्य पर्वणी.

## आहे पुढ्यात घडली

आहे पुढ्यात घडली सगळी जरी कहाणी
का मागशी जगा तू माझी उगा जबानी ?

आले तुझ्यासमोरी मी धुन्द यौवनात
केली तुझ्यासमोरी मी चांदण्यात प्रीत
ही वाट चालले मी साक्षीत पाऊलांनी....१

उचलोनि पाय घेता दिसली असेल मेंदी
नजरेत लपुनि राही का प्रणयगंध धुंदी
आताही पाहुनि घे डोळ्यामधील पाणी...२

आकाश कोसळु दे आकान्त मज रुचेना
खोट्या शुभाशुभाची मज कल्पना सुचेना
निस्सीम प्रीत केली जगण्यातली निशाणी....३

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
वा. क्र. ......
संग्र. शाखा (स्थळ प्रत)

## सदा तू सांगशी

सदा तू सांगशी सखया तुझी मी लाडकी आहे
अशा या खिन्न वेळी का तुला मी पारखी आहे ?...

दिसावी पुण्यवंताची मला जरी खूप आपुलकी
घडावा विरह दिनरजनी अशी मी पातकी आहे...

कळावी मज कशी केली मागिल जन्मी पुण्याई
असावे दूर तू कोठे अशी घडी घातकी आहे...

तुझ्यासाठीच हृदयी तुज मनाने मी दिली जागा
कसा ना फिरकशी मग तू जरि तुझी मालकी आहे...

असे जरि वाट माझ्या दारि तुझिया प्रणयपंढरीची
कशी खांद्यावरी एका तुझी ही पालखी आहे...

## रुतलेत किती खंजीर

रुतलेत किती खंजीर उरी आठवणी दाहक आठवितो
हृदयास दिल्या ओल्या जखमा फुंकरूनि विरवा दाखवितो

हरलो जरि मी त्यजिला नाही अर्ध्यावरी प्रीतीचा सौदा
लुटलेस मला तरि जिद्द मनी अजुनीही जुनी ती वागवितो

ते मीलन कुजबुजले कानी या पुढतीचा चिरविरह असा
परि दुःख नसे मनिमानसी की सहवासांचे क्षण साठवितो

या प्रीतीच्या छंदापायी जगण्याला जीवन सापडता
जन्मास येऊनी मी पुन्हा मरणा माघारी पाठवितो...

## आलापुनि माझ्या मनी

आलापुनि माझ्या मनी मी गायिला होता गझल
का ऐकता परि न कळता तव लोचने झाली सजल ?

किमया असे ही प्रीतिची, प्रेमातली जादू असे ?
माझ्या मनीची भावना सखये तुझ्या स्वप्नी वसे !
द्या कुणि मला समजावुनि प्रणयातले नवखे नवल !...

हुरहूर लावी या जिवा जी नित्य अधुरी आर्तता
प्रतिमेत का तुझिया परी हा दर्द शोधी पूर्तता
तुज पाहता मनभाबडा वृत्तीत का होई बदल ?...

दिसती जगाला दूर ती प्रीतीतली अपुली मने
असती मुलायम बांधिली अज्ञात रेशिमबंधने
करू पाहती सुखसंगती ती प्रीतिची यात्रा सफल !...

## भिकारी

डोळयात भासली की सौंदर्य जादुगारी
सर्वस्व देऊनी मी झालो असा भिकारी..

जरि प्रेम आंधळे हे म्हणती जगात लोक
प्रतिमा खरीच दावी मज आरसा बिलोरी...

धुंदीत भटकताना धुंडीत सावजाला
जाळयात अडकलो मी होऊनिया शिकारी..

समजावुनि मनाला वदताच सावधान
माझ्या शिरी पडे का मम शस्त्र हे दुधारी..

## जग हे विचित्र भारी

जग हे विचित्र भारी इथली विचित्र नाती
म्हणती नवे जुन्याला अन् मरती कीर्तिसाठी...

वरदान होई देहा अपुलेच दोन्ही हात
अशुभात एक गणती दुसऱ्यात शुभ पहाती...

नयनात, शिंपल्यात वसतीस थेंब पाणी
एकास म्हणती आसू दुसऱ्यास नाव मोती...

येथे मनामनांचे व्यापार वेगळाले
एकास राग द्वेष दुसऱ्यास लोभ प्रीती...

हे सर्व भूमिपुत्र एका वसुंधरेचे
एकास गनिम म्हणती दुसऱ्यास म्हणति साथी...

खाणीत शोधताना बहुमोली खनिज रत्ने
एकास म्हणति हीरक दुसऱ्यास गारगोटी...

जमवून आणलेला येथे जमे जमाव
एकात प्रेतयात्रा दुसऱ्यात वरवराती...

## दुनियेस शोधू दे

दुनियेस शोधू दे ना
दिसणार नाही कोणा
दोघास दिवसरात
बुडू प्रीतिसागरात...

उन्मत्त धुन्द असती
दीपगृहास भीती
लाटा उफाळलेल्या
नसतेच बंदरात...

श्वासात या सुगंधी
भिंतीपलीकडे ना
उभी एक रम्य भिन्त
उरलेत खेदखन्त

विश्वावरी विराजे
दोन्ही मनात उगवे
ऋतुमान वेगळाले
ही फक्त चान्दरात...

# चांदराती

चांदराति या आलिस उधळित सुगंध मौनावरी
अखेरची ही भेट होऊ दे मुकेपणी साजरी...

पदी पैंजणे, करी कंकणे, कानि मृदु मंजिऱ्या
किणकिणुनी तव मंगलगीते निनादती अधिऱ्या
हवी शान्तता, नसे देवता माझ्या हृद्‌मंदिरी...

नकोच गुंफू उगाच आता शब्दांच्या गोफा
उडतिल उद्या विवाहमंडपी विरहाच्या तोफा
देशोधडी मी, गोधडी मिरविन स्मृतिची जन्मभरी...

लाख कळयांनी फुलेल पुढती जीवनलतिका तुझी
सुरेल सुकल्या डोहाकाठी ही यात्रा माझी
प्रकाशपथि तू जा; मी जातो हळुहळु अंधारी...

घेऊनि जा तू संगे तुझिया निशिगंधी वारा
यापुढति मज वाट दाखविल विरहाचा तारा
घुमवित राहिन भग्नप्रीतिची मनी एकतारी...

## चक्रव्यूह

चक्रव्यूह रचिला कोणी असा जीवनाचा
डाव मांडिलेला सारा फक्त भावनांचा...

ठेच लागता कवणा, ना लोटला जमाना
मानुनी बहाणा मागिल होइना शहाणा
बळी जाई प्रेमिक येथे प्रणयदेवतांचा...

उतू जाति ऋतुऋतु होऊनि जणु दुग्ध तप्त
अन्ति गीत एकच गाती; आर्त सूर सप्त
सोस उरे गोंडस स्वप्निल भव्य कल्पनांचा...

काळजास चटका लावि क्षणिक एक चुटका
येई कळुनि आता यातुनि दिसत नाही सुटका
शोधितो मनाच्या भीतरी अर्थ वेदनांचा...

## पिलु

दिन मावळता असा लागते मला कळू
न कळताच रंगतो हृदयी राग हा पिलु...

धीर कसा सोडु मी झाले तव प्रेमिका
होई पाठमोरी का मैफलीस गायिका
गगन शान्त; चंद्रमा लागला जरी ढळु...

भेटीचा क्षण अजून आठवतो राजसा
विरहबनी भीति नसे प्रीतिच्या पाडसा
सावरते मीच मला सुरासुरातुनी हळु...

दिन मावळता असा लागते मला कळू
न कळताच रंगतो हृदयी राग हा पिलु...

## आर्त तुझ्या गीतातुनी

आर्त तुझ्या गीतातुनी छेडिले कशास सूर ?
चाहुल तव घेताना नयन जाहले फितूर...

तळमळ तव अंतरिची, सांगत धुन अधरीची
हेरगिरी करित घरी दूत येति तव चतूर...

नकळत घालुनि मोहिनी, येती सूर मज घेऊनी
लोचनि या का दाटे आज असा अश्रुपूर...

दुःख तुझे जे सावध करिते का मम पारध ?
अजुनि कसा थांबेना धपापता मदिय ऊर...

## दिले ज्याने

दिले ज्याने तुला रूप दिली त्याने मला प्रीत
दिले ज्याने तुला सूर दिले त्याने मला गीत...

कळेना कोणि सांगावे तुला प्रीतितले मर्म
इथे वरपांगी तिटकारा विरोधाभास हा धर्म
मनि तू जाण उद्याला दिली त्याने मला जीत
दिले ज्याने तुला सूर दिले त्याने मला गीत...

अबोला व्यर्थ धरिशी तू असे जो प्रीतिच्या पोटी
उद्या मी दूर जाताना सुरू होईल हाकाटी
कशाला अंगिकारिशि तू जगाची वेगळी रीत
दिले ज्याने तुला सूर दिले त्याने मला गीत...

## का ?

दिसे कसे असे उगा स्वप्न आंधळयांना
छेडावी लागतसे विराणी गळयांना...

लिही कोण शाईवाचुन
असे प्राक्तनात ?
दिसेना परन्तु म्हणती
हेच विधिलिखित
नशिब व्यर्थ देत बसे का अर्थ भविष्यांना
दिसे कसे असे उगा स्वप्न आंधळयांना...

पूर्वसंचितासाठी का
फुले उमलतात ?
येता शिरी कटुहि प्रसंगा
हसुनि नांदतात !
मुकेपणी उमलावे का लागते कळयांना
दिसे कसे असे उगा स्वप्न आंधळयांना...

शोध घेऊनी सौख्याचा
दुःख का फिरावे ?
वसुधेवर व्यर्थ कशाला
गगन कोसळावे ?
ऊन्ह फिरे वणवण शोधित गर्द सावल्यांना
दिसे कसे असे उगा स्वप्न आंधळयांना...

## दे मला साकी

दे मला साकी भरूनी आज या पेल्यात पाणी
गाऊ दे रसिल्या गळ्याने जीवनाची गोड गाणी...

खूष मी माझ्यावरी; अन् होष यावेळी हवी
मैफली आरंभ होता कोण गाइल भैरवी ?
कैफ हा बेहोषी जाइल वारुणीतुनी हरवुनी
गाऊ दे रसिल्या गळ्याने जीवनाची गोड गाणी...

सौख्य अन्तरि दाटलेले जागुनी करू दे सुखी
या युगास्तव होऊ दे मज क्षणिक मोहा पारखी
आळवीता ओठी ओवी आठवावी का विराणी ?
गाऊ दे रसिल्या गळ्याने जीवनाची गोड गाणी...

तप्त पदतळी वाळु होती होई रेशमी हळुहळु
तृप्त मन झाले मनाच्या या मनाला ये कळु
रम्य साठाउत्तरीची सफल झालेली कहाणी
गाऊ दे रसिल्या गळ्याने जीवनाची गोड गाणी...

## धुंद धुंद ही हवा

तो :- धुंद धुंद ही हवा मंद मंद गारवा
उतरला धरेवरी स्वर्ग हा नवा नवा...

ती :- चंद्रदीप लावुनी सजले नभमंदिर
तो :- धरतीच्या अंगणी ये उजेड स्वच्छ सुंदर
दोघे :- चांदण्यात प्रेमिका गवसला गोडवा
धुंद धुंद ही हवा मंद मंद गारवा
उतरला धरेवरी स्वर्ग हा नवा नवा...

तो :- अमर तुझ्या प्रीतीने सफल होई जीवन
ती :- या सहवासात तुझ्या फुलले रे मधुवन
दोघे :- हे असेच राहु दे प्रीतगीत राजिवा
धुंद धुंद ही हवा मंद मंद गारवा
उतरला धरेवरी स्वर्ग हा नवा नवा...

## उर्मिला

वादळी वाऱ्यातली ही रात्र का छळिते मला
आस वेडी, आसवे ही हाक देती रे तुला...

अन्तरी नैराश्य आहे दाटलेले, विखुरलेले
विसरू कैसी कधितरी जे क्षण सुखाचे तू दिले !
संगती मी लाविताना अर्थ त्यांचा हरवला
आस वेडी आसवे ही हाक देती रे तुला...

जाणवे विरही मनाला खेळ प्रणयी संपला
ऐकु ये हुंकार कुठुनी मूक परि स्पर्शातला
साधलेली तुज कशी रे प्रीतिची अद्‌भुत कला
आस वेडी आसवे ही हाक देती रे तुला...

रानकोटी तारकांचे दूर क्षितिजावरी जळे
पाहताना हृदयीची उद्‌ध्वस्त होती देऊळे
भोगते का एकटी जगी शाप केवळ उर्मिला
आस वेडी आसवे ही हाक देती रे तुला...

## नसेल माहित

नसेल माहित तुला नसावे अजुनि तुला कळले
वेड घेऊनी तुझे साजणी मन्मन हे भुलले...

कधि चालशी अपुल्या तंद्रीत तू मार्गावरुनी
दर्पण होऊन माझे डोळे तुज घेती टिपुनी
कितिकदा एकान्ती रडुनी बिंब मीच पुसले...

कधीकधी मी उगिच शोधितो उठुन पहाटे तुला
मधुकुंजी भासतो जिवाला झुलता गंधित झुला
झुलकावणी ही जिवा जाळिते डसती लाख इंगळे...

विसरूनि जातो तुझी कहाणी मन होते शान्त
तोच फिरूनि तू येशि कराया कहाणी सुखान्त
अंतर्यामी तुझ्या उठावे तरंग परि कुठले...

## नभाच्या अंगणी

नभाच्या अंगणी
शुक्राची चांदणी, आली ग साजणी...

सांगत हासुनी,
लुटाया रंगुनी, आनन्द मीलनी...
मिटल्या नयनी

तुझिया चिंतनी, प्रीतिचिये स्वप्नी...
सत्यात देखुनी

सांगतो पाहुनी, तूच ग देखणी...
सुगंध भरूनी
तू फूल होऊनी, टाकिले भारुनी...

तुझिया वाचुनी
रात्रही चांदणी नसे ग जीवनी...

## मी एकली

मी एकली बरी की, मज सुखविता कशाला ?
पाहोनि एकटीला, मज दुखविता कशाला ?

निरखून पाहिलेले मी सर्व रागरंग
माझ्यासमोर माना या झुकवता कशाला ?

बाजारी ना मिळे ते सुख एकलेपणात !
जा शांत रम्य जागी क्षण हुकवता कशाला ?...

आधीच रेखिलेले तुमचे खरे स्वरूप
ओढून आत घेता हा मुखवटा कशाला ?...

जळली जिवन्तपणी ही पूर्वी चिता मनाची
मेल्या मनास आता हा दुखवटा कशाला ?...

## ठेवून आपुल्या उशागती

ठेवून आपुल्या उशागती मी ज्योत दिव्याची मिणमिणती
लागता जरासा डोळा का तव मधुर कंकणे किणकिणती...

नीज न नैना काळी रैना चमकुनि काजवा सुचवितसे
शोध घ्यावया तुझा सखि माझ्या या नजरा भिरभिरती...

असा बहाणा, खेळ पुराणा, लपंडाव मज फसवितसे
मिरविशि का येता स्वप्नी, पदी पैंजणे रुणझुणती...

मीलनवेळा, धरिशी अबोला कसेतरी तुज वदवितसे
कोयलकंठी मात्र तुझ्या स्वप्नात गझला गुणगुणती...

## डोळा पाणी दाटे

डोळा पाणी दाटे अशी हवा काळीनिळी
सांज दिशा फिरे हाती घेऊनिया झोळी...

संकेताच्या स्थळी सख्या नको मला टाळु
घडी घडी सरकते पायाखाली वाळु
अजुनीही आहे मनी जखम ही ओली
सांजदिशा फिरे हाती घेऊनिया झोळी...

शाप नको निर्माल्याचा देऊ प्राणफुला
थोडा वेळ झुलू दे ना यौवनाचा झुला
देठापाशी आंदोलु दे मला वरखाली
सांजदिशा फिरे हाती घेऊनिया झोळी

श्वास श्वास मोजु दे ना हृदया सुखात
सवे तुझ्या घेऊनि जा आनंदबनात
दिवेलागणीची वेळ ज्वालेविना जाळी
सांजदिशा फिरे हाती घेऊनिया झोळी...

## मानिनी

चाल बेपर्वा तुझी; तू पायतळि ना पाहशी
जीव घेवोनी मुठीत पहुडले मार्गी अशी...

धुंद ही ना उतरली अद्याप प्रीतीची नशा
ना तुझ्या लेखी निसर्गातील संध्या अन् निशा
'कोण हा ?' सुमनांप्रती बघ भृंग करिती चौकशी
चाल बेपर्वा तुझी; तू पायतळि ना पाहशी...

कैक भोळ्या काळजांना लावियेले सुरूंग तू
घाव घालाया जिव्हारी बांधिलेला चंग तू
ना कळे प्रेमात तुझिया कुठुनि पडले मी अशी
चाल बेपर्वा तुझी; तू पायतळि ना पाहशी...

झुंजवीसी का कळेना प्रणयिनीला तू गडे
तू मला रे काय नेशी मृत्यूच्या वेशीकडे
मानिनी असुनीही झाले प्रीतीने वेडीपिशी
चाल बेपर्वा तुझी; तू पायतळि ना पाहशी...

## बोलून प्रेम बोल

बोलून प्रेम बोल तू लाविलासि छंद
लावून छंद वेडा केलेस विश्व धुंद...

धुंदीत त्या क्षणाच्या युग एकले बुडाले
घरटे करोनि चिमणे मनपाखरू उडाले
वाऱ्यावरी वरात पथ हा तया अरुंद...

कळले न श्रावणाला सौंदर्य आपुले ते
उनपावसात भिजते सुकवोनि आणि घेते
पर्जन्य मृत्तिकेला देई असाच गंध...

प्रीतीत रंगलेली विरली उषा प्रभाती
छंदात हरवल्या त्या मधुपुनव चांदराती
निशिगंध मात्र देई मन भाबडा सुगंध...

का स्नेहदीप होता तू लाविला उगाच ?
अंधारी चिंतनाचा चाले अखंड नाच !
तुटले तुझ्याच हाती सारेच प्रीतिबंध...

का साद घालु तुजसी तू ये; न ये; कसेही
मी गाऊनी विराणी वाहेन या प्रवाही
स्मृतिपाखरे गुलाबी देतील हाक मंद...

## चंद्रबिंब वरि कलते

चंद्रबिंब वरि कलते शततारक सोबती
विरहार्त मी तव सजणी कुणि नाही रे संगती...

शोध तुझा घेऊनि मी वेध तुझा घऊनि मी
चाहुल तव घेत घेत आले इथवर स्वामी
जडभारी पाऊल, मी उचलु कसे रे पुढती ?...

आशांची नव पल्लवी मोहरता गात्रात
फुलवुनिया स्वप्न नवे या गहिऱ्या नेत्रात
येता अवचित कळली मज माझी दैवगती...

स्पर्शकुशल वाऱ्याची झुळुक छळी कायेला
दु:ख सावळी करुणा करि अशी उदास मला
ये; ना तरि विरहाग्नित जाईन मी आज सती...

## जिथे मी गीत गाते

जिथे मी गीत गाते तिथे ही मैफल
तुझ्यासाठी वहाते सुरांची ओंजळ...

सुरांच्या गोडव्यात तालांची गुंफण
मेघांच्या मंडळात निथळे चांदणं
मोतिया चांदण्यात पांघरते खुळ...

संगमरवरी या प्रकाशाच्या लडी
भरली अथांगता आकाशाएवढी
सांगते तू न येथे डोळ्यातले जळ...

सौंदर्यरूप द्याया इथे गाणे मग्न
लकेरी अंतराळी मन परि खिन्न
कुशल चिंतताना जिवाला का कळ ?...

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
2740
दा. क्र. 23534
काव्य 24514 / 2
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

## मध्यरात्री

मध्यरात्री झोप अर्धी मोडुनी मी जागतो
चंद्रज्योतीच्या फुलांचा गंध भवती धुंडितो...

सागराच्या गूढ लाटांचे इशारे ऐकुनी
जाणिवांचे सूर छेडावे इरादे मनी
तोच मी जातो झपाटुन अन्तरंगा लपवितो
मध्यरात्री झोप अर्धी मोडुनी मी जागतो...

लोंबत्या त्या दूर पारंब्याच जवळी भासती
सळसळुनि मग उगिच पाने पिंपळाची हालती
गारव्यातही उष्ण माझ्या आसवांनी दाहतो.
मध्यरात्री झोप अर्धी मोडुनी मी जागतो...

वाटते घ्यावा नभीचा चंद्र अपुल्या ओंजळी
आणि भिजवावा निरागस नितळ अश्रुंच्या जळी
देऊनी ज्याचे तयाला अर्घ्य, माथा टेकितो
मध्यरात्री झोप अर्धी मोडुनी मी जागतो...

[library stamp]

## पानोपानी मंद सुशीतल

पानोपानी मंद सुशीतल झुळझुळती झुळुका
तुझ्या गळ्यातुन मला घालु दे कोमल हा विळखा...

दिशादिशातुनी समीर आले भिजुनी गंधात
विसरूनि जग हे असे बुडावे तुझिया छंदात
तू घननीळा सोड अबोला अन् रुसवा लटका
तुझ्या गळ्यातुन मला घालु दे कोमल हा विळखा...

दिवसयामिनी चाले नाटक तुझे विविध अंकी
लाड करुनिया माझे बैसवि आज तुझ्या अंकी
नयनांच्या पालखीत मिरवुनी करि मंगल घटिका
तुझ्या गळ्यातुन मला घालु दे कोमल हा विळखा...

तू आवरशिल कसे निसटते अधरातुन हासू ?
मौक्तिक होऊन किती साठवू लोचनात आसू ?
मुक्ति देऊनी कायमची मज करि ना तरी सुटका
तुझ्या गळ्यातुन मला घालु दे कोमल हा विळखा...

## पाण्यातले पहाता

पाण्यातले पहाता प्रतिबिंब हासणारे
आले मनात नवखे उमलून भाव सारे...

माझ्याच लोचनांना झाले अनोळखी मी
कळले न पाऊले की सोडूनि जाती भूमी
येती कसे फुलोनी अंगावरी शहारे
पाण्यातले पहाता प्रतिबिंब हासणारे...

मज पाहु पाहु वाटे अवघी निसर्गशोभा
माझा नि सृष्टिचा या आहे जुना घरोबा
धनदौलती सुखाच्या उघडूनि देती दारे
पाण्यातले पहाता प्रतिबिंब हासणारे...

नसता मनात माझ्या मज सौख्य आज भेटे
ओठात हे सुखाचे सुमधुर गीत येते
मनि मोर धुंद होती उभवूनिया पिसारे
पाण्यातले पहाता प्रतिबिंब हासणारे...

## संयोगिता

पृथ्वीराजा, पृथ्वीचे का राज्य मजसी तोलिता ?
योगिनी मी वाट पाहे, एकली संयोगिता...

प्रीतिचा संकेत जेव्हा जोडिला तुम्ही कधी
गणुनि मज सौंदर्यशाली बैसवियले निजहृदी
त्याच प्रेमळ भावनांना आज का मज वंचिता !
योगिनी मी वाट पाहे, एकली संयोगिता...

मोहरूनि उन्माद; येई गंध लावण्यासि या
यौवनाला बहर आला रंगल्या मधुमासि या
या अता; का हृदयवीणा विरहस्वरी झंकारिता
योगिनी मी वाट पाहे, एकली संयोगिता...

मी मुक्या मौनात आता एकली बुडते इथे
प्राण लोचनि या उभे; अन् देह अवघा हरवते
अंकिता मी फक्त तुमची, प्रीत का हो शंकिता ?
योगिनी मी वाट पाहे, एकली संयोगिता...

## प्रीतिकथेस अपुल्या

प्रीतिकथेस अपुल्या आरंभ गोड आहे
औत्सुक्यपूर्ण घटना रचनेत ओढ आहे...

नाही विचार केला कधि कोणता मनान
झाल्यात भेटीगाठी आता इथे नव्याने
मनिमानसी सुखाचा परिपूर्ण मोद आहे
औत्सुक्यपूर्ण घटना रचनेत ओढ आहे...

नवलाइची अनोखी अपुलीच ही कहाणी
सांगे न कोणी कोणा येई परन्तु कानी
कळते; परन्तु भासे थोडी अबोध आहे
औत्सुक्यपूर्ण घटना रचनेत ओढ आहे...

आभाळ वाकलेले दिमतीस चंद्र तारे
डोळ्यापुढुनी जाती पुढले प्रसंग सारे
तू शेवटास ने की मी कल्पनेत पाहे
औत्सुक्यपूर्ण घटना रचनेत ओढ आहे...

## मनमोकळी

फूल हे दिसे असे, जरी भासली कळी
जवळून कळुन येई ही मनमोकळी...

निरखून घेई गोडशी मोहक गाली खळी
आमंत्रिते मनाला या कल्पतरूतळी...१

तारुण्यगंध धुंदवी ना अजुनि स्पर्शिली
ऋजुतेत स्नेह उमले पाकळी पाकळी...२

पाहे नितान्त स्वप्नी ती देवाचिये गळी
भय सत्य दैत्यपायी जाईल का बळी ?...३

## फुलायचे म्हणुनी

फुलायचे ते म्हणुनी फुलले फूल बागेतले
तुझ्याविना परि हसण्यावाचुनि केवळ कोमेजले...

भेटायाचे वचन दिलेले जे तू मज काल
हळुच ऐकिले मुग्ध कळीने वागुनी खटचाळ
वाट पाहुनी दिवे विझाले तिच्या लोचनातले...

तुझ्या मनीचे तरंग उठले– मी समजुनि घ्यावे
कोमल स्वप्निल फुलास केवळ कैसे समजावे ?
सांगु न शकले तुजसी कोडे अपुल्या हृदयातले ! ...

भेट मला तू भविष्यात परि नको देऊ वचन
हळव्या शब्दामधुनि यापुढे नको फुलवु स्वप्ने
वचनपूर्तिविण भावुक मुग्धा प्राण त्यजिती अपुले...

## बेचैन जिवा रमवाया

बेचैन जिवा रमवाया का तव मधुर स्मृतींचा येई थवा ?
तसवीर तुझी लावुनि बसली का मजसाठी नयनात दिवा ?

तुज रीत कशी कळली नाही या प्रीतीची अन् मैत्रीची ?
दे हात तुझा या हाती मला; दुखण्यावर दाहक तोच दवा

हसते; मी दिसते खुष जगा; रुसते परि माझ्यावरती मी
का जाहिरनामा विरहाचा रक्ताने मज लिहिण्यास हवा ?

अभिशाप असे का प्रीतीला की तुज काही अधिकार नसे
हो प्रेमिक लाखातील असा, दे प्रीतीला तू अर्थ नवा !

## भेट ती

भेट ती आठवे किशोरीची
रात ती रम्य चंद्रकोरीची...

वाटले आधि जात पोरीची
ओळखी प्रीत गोष्ट छोरीची...

दाविली स्नेहखूण चोरीची
रंगली ओठि लालि होरीची...

जात ती भासली चकोरीची
मारलि गाठ किरणदोरीची

प्रीत ही गोड दानबोरीची
बेगमी जीवनी शिदोरीची...

भेट ती आठवे किशोरीची
रात ती रम्य चंद्रकोरीची...

## जीवनाच्या रंगरेखा

जीवनाच्या रंगरेखा पाहिलेल्या खूप मी
पाहिलेले भावनांचे बदलताना रूप मी...

पाहिले डोळ्यात आसू ढाळता मित्रांसवे
पाहिले अश्राप डोळे ढाळताना आसवे
अर्थ दोन्ही आसवांचा लाविता तद्रूप मी...

पाहिले येथे दिलाचे मंद जळताना दिवे
पाहिले मोसम मनाचे धुंद वळताना नवे
देखिला जळता अचानक यौवनाचा धूप मी...

भैरवी सरली तरी मन स्वस्थ कैसे बैसवे ?
उतरती हृदयांगणी नव रागदारीचे थवे
अळवितो रसिल्या नव्या या मैफलीमधी भूप मी...

## मनवारू

मनवारू माझा आधि चौखूर आहे
उधळून धावे यज्ञात चूर आहे...

विलयास जाता दुनिया मानवांची
तन गोठलेले प्रक्षुब्ध ऊर आहे...

मज काही सांगा लक्षात काय ठेवू ?
इकडून वारे तिकडे पूर आहे...

जग पेटलेले राखोंडी भावनांची
भवताली सारा धुम्मस धूर आहे...

उरला न कोणी अवघ्या जीवनाचा
अपुला जमाना म्हणती दूर आहे...

रडगाणे आर्त नेहमी ऐकुनिया
कळले मनाला गाण्यात सूर आहे...

## मित्र म्हणावे

मित्र म्हणावे ज्या सूर्याला तोचि शत्रू झाला
चंद्र शत्रू शर्विलकांचा तोचि कामी आला...

फायदा न काही कहाणी सांगुनी जगाला
चोरपाऊली ग्रह कुठला दुज्या धामी आला...

म्हणे कुणी नावाची ती उपाधी कशाला ?
टिभा एक बदनामीचा असा नामी आला...

प्रीत जखडिते हृदयाला खन्त ना मनाला
बहर अंगी रोमांचांचा रोमरोमी आला...

झोप येई दिवसा आता जाग येई रात्री
म्हणूनि म्हणे केवळ माझा चंद्र कामी आला...

## वालुका नसे

वालुका नसे प्रिये, याच कोकणातली
असती गार हिर्वळी...
स्वप्न रंगवुनि इथे, बघायचे असे तिथे
सागरातल्या जळी...
साठले मनातले, यक्षप्रश्न आपुले
सागरास सांगुनी
लाट देई सत्वरे, सर्व सर्व उत्तरे
ऐक तू मुकेपणी
पंख लावुनि मना, करुनि रम्य कल्पना
पाही वृक्ष नारळी...
लवण माधुरीतुनी, मरुत प्राण वुसळुनी
अंग अंग घेरिती
येई घडी घडी जशी, झेप घ्यायची कशी
गुपिते हेच सांगती
समुद्र शांत भासतो, परि उद्याच होई तो
क्षुब्ध धुंद वादळी...
वालुका नसे प्रिये, याय कोकणातली
असती गार हिर्वळी...

## व्हायचे ते होऊ द्या

व्हायचे ते होऊ द्या जे आज उद्या व्हायचे
जायचे आहेच तर मनि खोल भय का जायचे ?

कैक घडल्या पक्व झाल्या जीवनी कैफियती
सौख्य थोडे दु:ख भरले खच्चुनि या शेवटी
न्यायाचे न्या; नाही पुसणे अजुनि कोठे न्यायचे ?...

ज्योत लावा; पेटवा वा वन्हि फुंकर घालुनी
मूठ फेका ती गुलालाची पुढूनि पाठुनी
प्यायचे मग नाही पुसणे जहर हे का प्यायचे ?...

कुणिही वन्दा, कुणिही निन्दा चित्त माझे निश्चल
घातल्या ओव्याशिव्यांचे वस्त्र अंगी मंगल
घ्यायचे तर माथी अपुल्या सर्व काही घ्यायचे...

## पुसलेस आज आसू

पुसलेस आज आसू सुकलेत आज डोळे
न कळे कसे ? सदोदित हे राहणार ओले...

खेळून आपुल्याशी दुडदुडुनि मूल रांगे
पुढले भविष्य सारे कानात देव सांगे
मी ऐकिली विराणी नयनात तीच खेळे
न कळे कसे ? सदोदित हे राहणार ओले...

येशी समीप जेव्हा अधरी दिसे हसू जे
ते आणुनी उधारी उसने असे विराजे
खोटया प्रदर्शनाचे हे चित्र एक भोळे
न कळे कसे ? सदोदित हे राहणार ओले...

हृदयात काळजाची दुथडी भरून सरिता
वाहे अखंड आता देतात नेत्र वाटा
हे विश्व लोचनांचे मज पारखेच झाले
न कळे कसे ? सदोदित हे राहणार ओले...

## सदा बहार

सदा बहार तुझी सतार खुले दिवार हृदयाची
मनोमनात दिशादिशात सुरम्यरात प्रणयाची...

फूलपाखरी जणु वैखरी तुझिया स्वरी किल्बिले
गंधबावरी कुणि का परी अपुल्या परी झिल्मिले ?
ध्वनिनिनाद सुरेल दाद मिळे अबोध रसिकाची...

सूरसंगती दुडक्या गती मनाभोवती पसरते
सुखी अपूर्व नवीन पर्व पुढील सर्व विसरते
अशा प्रवाही मनात पाही उत्तुंगताही गगनाची...

## सांज झाली

सांज झाली सांगतो हा चंद्रवेडा सांज तारा
झांज वाजवि अन् दिशांची पश्चिमेचा गार वारा
रंगल्या संधीप्रकाशी संगती ये साजणा...

भेटती कोणि प्रियेला याचवेळी गोरज
साठलेले मुहूर्त सारे लोचनी या नीरज
आरसा उज्ज्वल दिसाचा निसटतो होऊनि पारा...

माझिया मार्गावरी का निर्मिले तू मृगजळ ?
ढवळिले माझे उगा अंतःकरण का सोज्वळ ?
स्पर्शिली काया कशाला ? अजुनि ना जाई शहारा ?...

लाविते सृष्टी दिशेला अक्षतांचे कुंकुम
आज नाही व्हायचा का आपुला रे संगम
भंगल्या मनि तर्क वेडे घालताती येरझारा !...

## शोधिते मी

शोधिते मी गीत माझे हरवले केव्हातरी
गवसले का कोणि सांगा ते कुठे केव्हातरी

रम्यगीताच्या नजाकत सांगते खाणाखुणा
नवलसुंदर ताजजैसा ढंग त्याचा देखणा
उमलता जैसा असावा गंध तो सुमनांतरी
शोधिते मी गीत माझे हरवले केव्हातरी...

लाजता बाला कधी गाली खुलावा रक्तिमा
रंग लालीलाल गीता ग्रीष्मि जणु तप करि उमा
झोक सारा आणि न्यारा तो असे गुल्मोहरी
शोधिते मी गीत माझे हरवले केव्हातरी...

## आभाळलेल्या जळात

आभाळलेल्या जळात आनंदली चांदरात
ओथंबलेल्या मनात झंकारते द्वंद्वगीत...
ओलेपणा काजव्यांचा दाहि दिशांच्या किनारी
या चन्दनी चान्दण्याला आली युगांची उभारी
भारावलेल्या मनाला सांभाळुया गात गात...
दोघातली कोवळिक दोघासही का दुखावे
आवेग सारा उनाड संकेतकाली सुखावे
पाणावलेल्या स्थितीत हासू कसे लोचनात...
डोळ्यातली गोड स्वप्ने भेटीत या देऊ घेऊ
प्रीतीतल्या भेटिगाठी ओठामधी जपुनी ठेवू
लाडावलेल्या मनांचे गोंजारूया हे गुपीत...

## राजसा झालास माझा

राजसा झालास माझा जे तुला कळणार नाही
सांगते शब्दात ते मी जे पुन्हा सुचणार नाही...
भाग्यवंता भाळि लिहिले नाव दैवाने तुझे
नाव लिहिले एकदा जे ते मुळी पुसणार नाही...
नाही पातक व्हायचे रे प्रीत ही विसरायचे
प्राण गेला जरी तरी मी असं कधी करणार नाही...
चुकुनि येईल ती घडी अन् जरि कधी मी दुखावले
लोचनी येतील आसू पण तुला दिसणार नाही...
यापुढे दोघांमधी मतभेद काही जाहला
एकतर्फी दे निवाडा मी तिथे असणार नाही...

## झोकले आयुष्य माझे

झोकले आयुष्य माझे मुक्त मी आता असा
रूप स्वरूपातून गेले फोडिला मी आरसा

भालि जे सान्निध्य होते भोगले त्या वेळी ते
यापुढे उरल्या घडीला वंचनेमधि का फसा ?

कोण म्हणतो काय कोणा मज जगाची ना क्षीति
प्रीतकैफि कलंदराने उगिच घ्यावा का वसा ?

गायलो जे एकटयाने दर्दभरी गाणे असे
मैफलीचे गीत माझे देऊ कैसे कोरसा ?

आपुल्या या संचिताचे आपणच व्हावे धनी
द्या कशा कोणास माझा चालवाया वारसा ?

झोकले आयुष्य माझे मुक्त मी आता असा
रूप स्वरूपातून गेले फोडिला मी आरसा

## सूर्यप्रिया

सूर्यप्रिया मी छाया ही काया मंतरली
रवि जेथे जाय तिथे तनु माझी व्याकुळली...
पसरूनि मी अंग अंग शय्येवरी राजभरी
सुस्तावुनि स्वप्न बघे होते मी स्वप्नपरी
घेई खुडुनि स्वप्नफुले स्वप्नातच मोहरली...
कानि लहरी येती जशा मन्द भरुनि अवकाश
नीज तशी जागतसे लोचनात ये प्रकाश
उठुनि मार्ग चालतसे पंच पंच उषःकाली...
मजसि नसे माझेपण अंकित मी दुसऱ्याची
मुग्धपणे बोलतसे मुग्ध बोली प्रणयाची
रविराजा अंबरी तो, राणी मी वसुधातली. .

## सुरईत जसे

सुरईत जसे मद्याच्या मिसळती थेंब द्राक्षांचे
हृदयात सखि या तैसे क्षण तुझ्या धुंद नजरेचे...

नजरेत जाहला पहिल्या प्रीतिचा नवा संकल्प
स्वप्नातही दिसला नाही असाच कायाकल्प
प्रणयाच्या नवपंखांनी सुटले पाऊल धरेचे...

ठाऊक नव्हती हृदयाला भावूक मनांची प्रीती
नाजूक अशा बंधानी बांधति या रेशिमगाठी
कैफात झोकतो पुढती तनमन चिरतारुण्याचे...

थरथरत्या अधरावरती हुरहुरते ही बेहोषी
मज फिकिर नसे उद्याला तू माझी होशि न होशी
आजच्या क्षणाला जगलो; मज कौतुक काय उद्याचे ?...

## प्रीतिचे वर्ष

माझिया कळले मनाला प्रीतिचे हे वर्ष आहे
मीलनाचे मोजके क्षण जीवनी संघर्ष आहे...

गल्बला झाला सभोती जवळी केवळ साथी तू
भाबडया डोळयांसमोरी परि तुझा आदर्श आहे...

पोळले मन, जाळते स्वार्थी जगाची चाहूल
रेशमी तव आठवांना मोरपंखी स्पर्श आहे...

खेद होतो ऐकताना जीवघेणी बोलणी
अन्तरी परि कोंदलेला दाटलेला हर्ष आहे...

## तूच एकली

तूच एकली रमणी नाही जगि उपजलेली
घालु कशाला मी गोंडा तुझ्या भोवताली...

व्यर्थ आस उमद्या मनि मी बाळगली होती.
धन्य असे कोमल कान्ता जिची रम्य कांती
आज कळे भ्रम माझा तू नसशि भावभोळी...

बाण फेकिले आधी तू गंध अत्तरांचे
कोमलांगि दावियले मग दिल् फत्तराचे
प्रथम भेट चोरूनि तेव्हा तूच घेतलेली...

तुझा कचकड्याचा घेऊनि देह जाई बाले
प्रिया म्हणाया तुज, अधरी शब्द अडकलेले
सापळा रचाया दुसरा मोकळिक झाली...,

## काही ना मजपाशि

काही ना मजपाशि आता मी जगा पोसू दिले
दु:खिता आसू दिले अन् स्नेहला हासू दिले...

होऊनि समरस दुज्यांच्या ठायी केवळ गुंतलो
मी मना समजावुनीया दु:खही सोसू दिले...

पाहिले दुर्भाग्य जेव्हा मी दुज्यांचे लोचनी
ठेवुनि उघडेच डोळे भाग्य मम नासू दिले...

लोळलो असतो धन्यांच्या गादिवरी आजन्म मी
तेच विश्वासाठी तन मी चंदनी घासू दिले...

बांधिली कोणी समाधी मदिय जरि म्हणेन मी
मीच पुतळ्यावरती माझ्या कावळे बैसू दिले...

## कधी कधी

आकंठ बुडुनि जातो दु:खात मीच माझ्या
दुसऱ्याचे दु:ख नाही पहावत कधी कधी...

विक्षिप्त लोक देती अनुभव नवे नवे
नाही अनुभवाने पस्तावत कधी कधी...

शरमिंद्या हकिगतीनी होऊनि मीच मिंधा
नाहीच या मनाला सुनावत कधी कधी...

संपूर्णत: निघाले अकलेचे जरि दिवाळे
व्यवहार पहात नाही किफायत कधी कधी...

जग सौख्यी नाहताना; ऐश्वर्य भोगताना
माझ्या मनास नाही सतावत कधी कधी...

## दोन लोचनांनी

दोन लोचनांनी सजणा तुला किती पाहू ?
धुन्द गज्जलांच्या माला तुला किती वाहू? ...

नसे एकटी मी आता तुझी मला साथ
मन्तरली काया माझी तूच प्राणनाथ !
प्रीत अन्तरीची माझ्या होऊ दे चिरायु...

घेऊनी तुझ्यास्तव आले जन्म ओंजळीत
प्रणयज्योत हृदयामध्ये सदा प्रज्वलीत
रंग पाहता प्रीतीचे एकरूप होऊ...

कोण सूर छेडी कानी मंगलाष्टकांचे ?
कोण अर्थ उलगडुनी दे मला प्राक्तनाचे ?
एकजीव होऊ सखया नको दूर जाऊ...

## भेटली नसतीस जर

भेटली नसतीस जर तू ठाऊके माझी दशा
अमिर असुनी फकिर होऊनि झाली असती दुर्दशा...

फिरकलो नसतो कधी मी मृदु फुलांच्या नगरिला
धुन्द होऊनि पाकळ्यांचा गन्ध नसता घेतला
तुडविले असते पदी मी फक्त कंटक दशदिशा...

असुनि लोचन दोन्ही असतो जगुनि अंधाचे जिणे
श्वापदापरि जाहले असते कुठे खाणे पिणे
पारखा झालोच असतो रम्य सौंदर्या अशा...

लाभलेली जीवनाला तुजमुळे ही बैठक
जीवनाच्या मैफलीचे सूर कोमल नाजुक
दिवसयामिनी रंग भरती सुस्वरातुन बंदिषा...

## ठेविशी आरोप का ?

ठेविशी आरोप का तू प्रीतिचा माझ्यावरी
का असा उलटा मिळावा न्याय यौवनमंदिरी ?...

राजहंसा पसरूनि तू पंख अपुले गोजिरे
उतरशी मानसजली अन् बिंब बघुनी हासरे
प्रणयलीला तूच केल्या प्राशुनिया माधुरी...

स्तब्ध होते मी; परन्तु हालले थोडी जरा
तोच बाहुंचा तुझ्या या जाहलेला पिंजरा
घाव का तू घालिशी पाळीव या पक्ष्यावरी ?...

प्रीत तू केलीस झाले पुण्य ते लाखातले
प्रीत मी केली म्हणावे पाप भूवरी जाहले
पापपुण्याचा असा हा भार माझ्या अन्तरी..

## प्रेमगीते गोड गा

प्रेमगीते गोड गा राणी मनाला दे तजेला
गा तुझी दिलदार गीते, आवडीच्या मजसि गज्जला !

बाग अधरी पाहतो मी रागमालांची तुझ्या
बुलबुला तुझिया मनाच्या देई गंधित पुष्पझेला !

अम्बरी नक्षत्र तारे तेज हरवुनी पाहताती
दे मला तेजस्विनी जो किरण तव ठायी उदेला !

धुन्द यावी मन्मनाला छेड ऐसी रागिणी तू
झोल दोराविण अस्मानी सूरपंखी एक झोला !

## आसवांचे गीत

आसवांचे गीत माझे ऐकिले तू पाहिजे
हो सुखाचा सोबती अन् दुःख दे मजला तुझे...

अश्रु माझे पाहुनी तू खिन्न का होशी मनी ?
लाभले तारुण्य; हे कारुण्य येते मागुनी
इंद्रधनु नभि रंग ते आभाळ जेव्हा ते भिजे...

मानिले अपुले मला अभिमान मज वाटे तुझा
प्रीतिसाठी तू जगाचा राखिला न मुलाहिजा
तीच प्रीती परत द्याया बघ मनाने मी सजे...

कोसळावा पावसाळा लोचनी केव्हा असा
हृदय व्हावे स्वच्छ सुंदर आरसा निर्झर जसा
दुःख अपुले भोगताना स्वर्गसुख झाले खुजे...

## सुख छळते

सुख छळते; दु:ख छळते; तन जळते, मन जळते
न कळते करू काय मी प्राणप्रिया...

तुझी माझी प्रीत होती जी तुझ्यामाझ्यात
गुपित गोड काल; सर्व आज चारचौघात
सदा सावरीला कसा, लहरी आवरील कसा
अवचित उफाळला दरिया...

स्पर्श तुझा झाला अन् अंगअंग मोहरले
दंश प्रीतिचा होता माझेपण मी हरले
अशी हरवुनी गेले, जगा विसरुनी गेले
पडे मोहिनी, तुझी किमया...

नको नको होई कधी आपुलीच काया
धीर देई अनामिका मंतरली माया
न कळे तरी अजुनी मला, जीव तुझ्यातच रमला
जगू कशी तुजविणा रसिया...

## तुला ध्यानीं मनी स्वप्नी

तुला ध्यानी मनी स्वप्नी जरी मी रोज पाहावे
तरी तू प्रेमळा माझ्या सान्निध्यात राहावे...

जरासा स्नेह जुळता मी जहाले धुंद बेहोष
स्वये ओलांडिली सीमा, कुणाला लावणे दोष ?
नको लोटू असा तू दूर, मन निष्ठूर का व्हावे...

धजे मी आज रे करण्या तुझ्यावर एक आरोप
असे तू लाविले नाथा मुलायम प्रीतिचे रोप
पहा विरही जळे रोप, अश्रुजले स्नान घालावे...

जरी ऐकोनि ही साद, मजला देशि ना दाद
तुझ्या कानिकपाळी मी सुनाविन तुझिच फिर्याद
नसे पुसली, खूण ठसली, उमटली गालि तव नावे...

## भीती

कवटाळुनी मनाला बसली अखंड भीती
अन् त्यात भेटली ही मजसी तुझीच प्रीती ! ...

खुलवोनि घोळविता सुखपूर्ण गोड गझला
कडु घोट कोठुनी हे येती कशास ओठी ? ...

मन चांदण्यात न्हाते प्रणयात आपुल्या या
अव्यक्त अश्रुधारा का लोचनात येती ? ...

हृदयात ज्योत लावी दिनरात प्रीतदेवा
झळ लागते उन्हाची परि का भयाण राती ? ...

जरि रम्य प्रणयज्योती मज दावि हा प्रकाश
अवघे जिणे नवे हे का जाळतील ज्योती ? ...

## प्रश्नोत्तरे

तो म्हणाला, ‘ सांग कैसी घालिशी तू मोहिनी ?’
ती म्हणाली, ‘ लोचनांनी आपुल्या घे पाहुनी ! ’
तो म्हणाला, ‘ तू वियोगे होशि केव्हा पारखी ?’
ती म्हणाली, ‘ दूर नाही; मीच छायेसारखी ! ’
तो म्हणाला, ‘ प्रीतिमाजी घेशि का व्रत तू मुके ?’
ती म्हणाली, ‘ भावनांचे गूज नोहे बोलके ! ’
तो म्हणाला, ‘ पूर्तता माझ्या जीवाची तूच का ?’
ती म्हणाली, ‘ उत्तरे प्रश्नात शोधि प्रेमिका ! ’
तो म्हणाला, ‘ सांग कैसी घालिशी तू मोहिनी ?’
ती म्हणाली, ‘ लोचनांनी आपुल्या घे पाहुनी ! ’

## साम्य नि फरक

आकाश स्वप्नी पाही पृथ्वीवरी सडक
सापेक्ष सर्व आहे हे साम्य, तो फरक

पृथ्वीत मत्त चित्रे स्वर्गातल्या पऱ्यांची
स्वर्गात कल्पनेचा असतो सदा नरक !

पाण्यात राजहंसा कळते खरे बदक
वीरा, तुला दिसेना मरणोत्तर कधि पदक !

## पहिल्याच तव नजरेतली

पहिल्याच तव नजरेतली        का पापणी खाली झुके ?
संकेत क्षणि या मीलनी        का जाहलो दोघे मुके ?...

घे बोलुनि जन्मातले        असशील जे तू घोकिले
येता सुगी का ठेविशी        तू प्रीतिचे पक्षी भुके...

का लाजुनी संधी अशी        तू जाऊ देशी हातुनी
अभिसारिके, गुपिते तुझी        असती मला ग ठाऊके...

उन्ह कोवळे हळु पसरता        जाईल विलयाला धुके
हे वेड एक लपेटुनी        का दूर लोटिशी तू सुखे...

संकोच का ? तव वैखरी        रुसली अशी ओठावरी
वसुधा पहाते कौतुके        आभाळ जरि झाले फिके...

## संधीकाली या अशा

संधीकाली या अशा धुंदल्या दिशा दिशा
चांद येई अम्बरी
चांदराती रम्य या संगती सखी प्रिया
प्रीत होई बावरी...
मुग्ध तू नि मुग्ध मी अबोल गोड संभ्रमी
एकरूप संगमी
रातराणीच्यामुळे श्वास धुन्द परिमळे
फुलत प्रीतीची फुले
प्रणयगीत हे असे कानि ऐकु येतसे
गीति शब्द ना जरी
सांजरंगी रंगुनी न कळताच दंगुनी
हृदयतार छेडुनी
युगुलगीत गाऊनी एकरूप होऊनी
देऊ प्रीत दावुनी
प्रणयचित्र हे दिसे रंगसंगती ठसे
कुंचला नसे जरी
संधीकाली या अशा धुंदल्या दिशा दिशा
चांद येई अम्बरी

## नको वायदा

उद्याउद्याचा नको वायदा हिशेब अपुला चोख हवा
प्रीतीचा व्यवहार साजणी, नको उधारी, रोख हवा...

कोळुन प्यावी शास्त्रपुराणे; पाठ असो भगवद्गीता
प्रपंचामधी सखि परन्तु अपुल्याच मनाचा श्लोक हवा...

जगात राहुनि जगावेगळे जग पहाया सवय हवी
लोकांपासुनी दूर असा ग एकान्ती परलोक हवा...

मीलनवेळी मिटुनि जावे मुग्ध पाकळ्यांपरी सहजी
घडिभर सरत्या परन्तु घडिचा मनात थोडा शोक हवा...

थोडा धोका, तर्कही थोडे; या व्यवहारी कमी हमी
एक क्षणाच्या जगण्यासाठी एक युगाचा शोक हवा...

## वाट

वाट मी जेव्हा अशी पाही तुझी
पाहती वाटा दिशा दाही तुझी...

चैन नाही या जिवाला राजसा
मीलनाची याद ही ग्वाही तुझी...

कैद झाले मीच माझ्या बंधनी
घोर शिक्षा मी अशी साही तुझी...

जीवघेणी जरि प्रतीक्षा भासते
प्रेमिका भलतीच उत्साही तुझी...

दुःख भोगी लाडकी राणी तुझी
भेटता राजा, जगी द्वाही तुझी...

वाट मी जेव्हा अशी पाही तुझी
पाहती वाटा दिशा दाही तुझी...

## सखि मदिरे

स्वरूपाचे सखि मदिरे खरेपण तुजमुळे आले
जगी या सर्व खोटयांच्या खरे मज बोलता आले

भयानक संकटांनी खिड गाठुनी वेढिले मजसी
किती मरणास जगताना असे हुलकावता आले

पहुडली शान्त शय्या मी करूनी उमरखय्यामी
मनाचा करुनिया हिय्या मला समजावता आले

जबानी मागता कोणी दिला मी जीव कुर्बानी
जगाचे कायदे सारे पदी झिडकारता आले

दिलाचा होऊनी राजा जहाली रोज दिपवाळी
जळुनी रोषणाईने जिण शिलगावता आले

## दिवसा कळते

दिवसा कळते प्रीत आपुली झुळझुळत्या या वाऱ्याला
गुपित आपुले रात्री कळते झिलमिलत्या त्या ताऱ्याला...

लपुन छपुन भेटता मीलनी थरथरती अस्फुट ओठ
स्पर्श पुसटसा होता भरते गोड शिरशिरी अंगात
फुलुनि मन आनंदे करिते लज्जित मोरपिसाऱ्याला...

कुजबुजुनि कुणी काही म्हणुद्या भीती नाही प्रणयाची
यात्रिक होऊनि प्रेमिक बांधिती हृदयि राऊळे प्रलयाची
अथांग सागरि भिते होडी का दीपगृहाच्या इशाऱ्याला...

उरात भरता प्रीत पेटती लवथवता अंगी ज्वाला
समीप सजणा बैस तुझ्या मी उत्सुकले सहवासाला
क्षितिज निळे करण्याला अपुले लागे ओढ किनाऱ्याला...

## समिधा

भंगलेल्या भावना
वणव्यात साऱ्या पेटल्या
मीलनाच्या धुंद बागा
आज झाल्या मोकळ्या...

वादळाच्या रौद्र रंगा
भीतिने मी पाहुनी
घेतले एके दिनान्ती
खिन्न डोळे झाकुनी
फुलुनि जळली ही फुले
अन् जळुन फुलल्या पाकळ्या...

देहचंदन झिजुनि जाता
हृदय गाई आरती
अग्निकुंडी भावनांचे
गंध देती आहुती
प्रीतिच्या यज्ञात माझ्या
दोन समिधा टाकिल्या...

## अस्फुट अक्षरावरती

अस्फुट अधरावरती तुझिया गुपित गुलाबी थरथरते
प्रियंवदे, मज सांग एकदा काय तुझ्या मनी हुरहुरते...

केस मोकळे स्वैर लहरती सैरभैर वाऱ्यावरती
अलिकडुनी पलिकडे पहाया नजर अशी का भिरभिरते ?

नसे शुद्ध तुज कसली जणु की मनात गुंजे शहनाई
मदालसेपरी धुन्द भासशी, वसन धवल तव हुळहुळते...

मधेच का तव अंगाकांतिही बावरलेपण सावरते
वाऱ्यावरती हळवे पिंपळपान जसे की सळसळते...

मंद हसशि तू मोनालिसा जणु रम्य अमर चित्रामधली
बाळे, तुझिया कानी अल्लड गीत कोण ते गुणगुणते...

## कुणी उठावे

कुणी उठावे अनोळख्याने मला कथावी निवेदने
अधीर आश्वासनात देइन धीरगंभीर सांत्वने...

स्वत:च सोसुन झळा उन्हाच्या उभा पेटतो ग्रीष्म जसा
हरिमंदिरी हरिदास जणू मी अधरि रसपूर्ण कीर्तने...

अवीट रसार्द्र अश्रुरूचीने दु:ख माझे पितो जरी
अजुनि धाडितो तरी न चुकता दु:खिताला निमंत्रणे...

दिसो न डोळा सौख्य शान्तता स्वास्थ्य न लाभो कल्पांती
जरि न दिसले दु:ख दुज्याचे होइल माझे व्यर्थ जिणे...

## चुकवून आज आले

चुकवून आज आले सारा खडा पहारा
देई तुझ्या कुशीत आता मला निवारा...

होते मनात माझ्या ओले अबोल रंग
देहावरी कळेना उठले कसे तरंग
छंदात प्रीतिच्या ये अंगावरी शहारा...

भीति मनि कशाला पाहील तुजसि कोणी
दोघात राहु दे रे अपुली नवी कहाणी
समजे तुला न कैसा प्रणयातला इशारा...

का दूर तू उभा रे अजुनीही संभ्रमात ?
दरियात प्रीतिच्या या घेऊ उडी क्षणात
अज्ञात पैलतीरी चल पाहुया किनारा...

## प्रीतबाला

तुझ्या दारि आली तुझी प्रीतबाला
तुझी ओढ आहे तुझ्या प्रेयसीला...

तुझ्या जीवनी गंध यावा सुरांचा
असे गीत गाईन मी नन्दलाला...

तुझ्या जीवनी रंग यावा खुलोनी
असे चित्र होईन मी संगतीला...

तुझ्या जीवनी स्वप्न यावे फुलोनी
असे रूप देईन मी जागृतीला...

सुधा प्रीतकंठी असे आज माझ्या
तुझ्या जीवना अर्थ घे धुंदलेला...

तुझ्या दारि आली तुझी प्रीतबाला
तुझी ओढ आहे तुझ्या प्रेयसीला...

## रंगली मेंदी कशी ?

तो म्हणाला– ‘रंगली मेंदी कशी हातातुनी ?’
ती म्हणाली– ‘आज आले प्रीतिच्या मी दालनी !’

तो म्हणाला– ‘प्रीत माझी पाडिते का संभ्रमी ?’
ती म्हणाली– ‘फेकिले तू पाश गंधित रेशमी !’...

तो म्हणाला– ‘काय होई प्रीतसरिता वाहता ?’
ती म्हणाली– ‘बुडत असता काही ना ये सांगता !’...

तो म्हणाला– ‘वेड आधी तूच हे ना लाविले ?’
ती म्हणाली– ‘रूप माझे मी तुझ्यातच पाहिले !’

तो म्हणाला– ‘खूप बाजारात होते दर्पण.’
ती म्हणाली– ‘सर्व केले ते तुला मी अर्पण !’

## चांदण्यात चंद्रकले

चांदण्यात चंद्रकले नको झुरवु कपिंजला
किरणास्तव आशेने तिष्ठतसे तहानेला...

चांदण्यात चंद्रकले चंद्रकमल उगवू दे
निशिगंधासम अपुला धुंद गंध पसरू दे...

चांदण्यात चंद्रकले रोहिणी सखी रुसली
सूर्य स्वप्नि पाहुनिया पौर्णिमेत हरवली...

चांदण्यात चंद्रकले मन्द समिर मन्दावला
अन् मधेच अम्बरात श्वेत मेघ थांबला...

चांदण्यात चंद्रकले रजतकळशी लवंडली
रसपानी धरतीनयनी शान्त नीज लोटली...

चांदण्यात चंद्रकले नको छळु कुणा कुणा
फेडणार पाप कुठे करूनि प्रीतिचा गुन्हा...

## एकवार भिजु दे

एकवार भिजुदे सखया प्रणयचांदण्यात
तुझ्यासवे सौख्य लुटू दे मजसि बंधनात...

आठवते अजुनी पहिली भेट तुझी माझी
अजुनि पुष्पगुच्छामधली फुले दिसत ताजी
देह ज्या क्षणी विरघळला धुन्द चन्दनात...

पाहताच तू हृदयाच्या छेडिल्या सतारी
निर्मिलीस नवखी दुनिया सुरातुन सारी
होऊनिया गज्जल गाशी तूच अन्तरात...

लोचनात दिसु दे तुझिया चंद्र पौर्णिमेचा
चांदण्यात दिसु दे तैसा दीप लोचनांचा
फाकु दे प्रभा तेजाची उभय जीवनात...

## जाऊ कशाला दूर ?

जाऊ कशाला दूर; तू तर जवळपास असतोस
जिथे तिथे मज परमेश्वरा तू दिसतोस, तू दिसतोस ! ...

तुझ्या कृपेविण कसे हलावे प्रभुजी पिंपळपान ?
तुझीच करणी दाखवि पाणी नारळात भगवान !
सुहास्यवदनी फुलाफुलांतुनी तू हसतोस, तू हसतोस ! ...

तुझ्याच प्रतिमा रम्य गोधनी तेहतीस कोटी
वत्सल माया तुझी पहुडली बघ सरितेपात्री
तूच वर्षाकालि धरेची मलीनता पुसतोस ! ...

तुझी लेकरे तुला ठेविती कधी कधी नाव
तूच तारिली भवसागरि जी बुडविशी ती नाव
अथांग दरियामधी होऊनि तुफान तू रुसतोस ! ...

तूच फुलविशी मनामनातुनी मोरपंखी आस
इंद्रधनूचे स्वप्न दाविशी तू आभाळास
दिनरजनी रविशशी होऊनी संतत तू बसतोस...

## शाल्मली छायेत

शाल्मली छायेत जेव्हा तू मला बोलाविले
प्रियकरा तव नाव घेऊनी कुंकु भाली लाविले...

भाबडा संकेत होता भेट होती चोरटी
हालली मागेपुढे माझ्या मनाची राहुटी
सावराया तोल ढळता आजुबाजुस पाहिले...

चुंबुनि धरतीस नभ ते भेटताना किंचित
घेतले मज ओढुनि तू त्याचवेळी अवचित
अन् अकल्पित शुभघडीला नयन हे ओलावले...

दूर नभि आकाशदीपांच्या प्रकाशी चंद्रमा
कौतुकाने पाहु लागे फुलविता तू पौर्णिमा
द्यावया जगतास शशिने किरण स्नेहल चोरिले...

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
2740
दा. क्र. 23534
कार्य 25154152
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

REFBK-0023535
REFBK-0023535

## नाही जगात कोणी

नाही जगात कोणी माझे म्हणावयाला
मी पारखाच झालो आता उभ्या जगाला...

जे फूल प्रीतिचे मी कधि वाहिले मनानें
लाथाडुनि दिले ते पायातळी प्रियेने
रवि सोडुनि निघाला अंधारल्या नभाला
मी पारखाच झालो आता उभ्या जगाला...

जे गीत प्रीतिंचे मी कधि गायिले सुखाने
घायाळ मजसि केले परि त्यातल्या सुराने
नयनात आसवांचा हा पूर दाटलेला
मी पारखाच झालो आता उभ्या जगाला...

माझी अखेर आता घेई जगा सलामी
संपून जाऊ दे ना ही प्रीतिची गुलामी
माझा न मीही आता का भार या जगाला
मी पारखाच झालो आता उभ्या जगाला...